# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

बुधवार, दिनांक ०५ मार्च, २०२५ / फाल्गुन १४, १९४६ (शके)

**(१) मुख्यमंत्री**
**(२) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री**
**(३) इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री**
**(४) पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री**
**(५) माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री**
**(६) परिवहन मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २१**

---

### राज्यातील वीज ग्राहकांकडे स्मार्ट प्री-पेड वीज मीटर न बसविण्याबाबत

**(१) * ३५७ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने वीज देयक थकविणाऱ्या, वीज चोरी करणाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्मार्ट प्री-पेड वीज मीटर' योजना कार्यान्वित केली असून राज्यात महावितरणने सदरहू योजनेच्या अंमलबजावणीसाठी २७ हजार कोटी रूपयांची कामे विविध कंपन्यांना दिले असून राज्यात महावितरणमार्फत नादुरुस्त वीज मीटर बदलताना त्या ठिकाणी स्मार्ट प्री-पेड वीज मीटर बसविले जात असल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यभरातील ग्राहक संघटना, वीज कामगार संघटना, राजकीय पक्षांनी सदरहू योजनेच्या विरोधात पुकारलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सामान्य वीज ग्राहकांकडे स्मार्ट प्री-पेड वीज मीटर बसविले जाणार नसल्याची घोषणा तत्कालीन ऊर्जा मंत्री महोदयांनी माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले असून राज्यातील सामान्य वीज ग्राहकांकडे स्मार्ट प्री-पेड वीज मीटर न बसविण्याबाबत व मा.ऊर्जा मंत्री महोदयांनी केलेल्या घोषणेची अंमलबजावणी करण्याकरीता तसेच वापरात असलेले मीटर सुरु ठेवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
सद्य:स्थितीत प्री-प्रेड पध्दतीने वीज मीटर बसविण्यात येत नाहीत.
(२) होय, हे खरे आहे.
सदर घोषणेच्या अनुषंगाने ग्राहकांना स्मार्ट मीटर पोस्ट पेड पध्दतीनेच बसविण्यात येणार आहेत. सदर मीटर प्रथम महावितरणच्या विविध प्रणाली (System Metering-Feeder आणि Distribution Transformer) मध्ये बसविण्यात येत आहेत. तद्नंतर सदर मीटर हे प्राधान्यत: शासकीय कार्यालये, शासकीय वसाहती तसेच उच्चदाब व लघुदाब औद्योगिक, वाणिज्यिक ग्राहकांना व नवीन वीज जोडणी करीता बसविण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे थीम पार्क संग्रहालय उभारण्याबाबत

**(२) * ४२६ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सत्यजीत तांबे, श्री.अमित गोरखे, श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक सोहळयाला ३५० वर्षे झाल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने (एमटीडीसी) राज्यातील पाच ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाच्या विविध पैलूवर आधारित डिजिटल थीम पार्क संग्रहालय उभारण्याचा प्रस्ताव सादर केला असल्याची बाब माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावामध्ये शिवसंगत नाशिक हे संग्रहालय छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनुष्यबळ विकास आणि त्यांच्या सैनिकांच्या व्यवस्थापनावर प्रकाश टाकणारे असून, संग्रहालयाच्या ५० कोटी रुपयांचा शिवसृष्टी डिजिटल थीमपार्कचा प्रकल्प जळगाव येथे स्थलांतरित केले जाणार असल्यामुळे नाशिक येथील शिवप्रेमींमध्ये असंतोष निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक येथेच छत्रपती शिवाजी महाराज यांचे थीम पार्क उभारण्यासाठी तसेच पाच ठिकाणी होणाऱ्या थीमपार्कचे काम त्वरित पूर्ण करण्यासाठी व प्रस्तावित स्थलांतर रद्द करून ग्रेप वाईन पार्क गंगापूर, नाशिक येथे मंजूर असलेल्या शिवसृष्टी प्रकल्पाचे नाशिक येथील मूळ जागेत बांधकाम सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांचेकडून शासनास सुधारित प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्रकरणी शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरळी दुग्धशाळा वसाहतीच्या पुनर्विकासाबाबत

**(३) * १८८ श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी (मुंबई) येथील शासकीय दुग्धशाळा वसाहतीत असलेल्या एकूण १० इमारती अत्यंत धोकादायक अवस्थेत असून, सदर इमारती कधीही कोसळून जीवित व मालमत्तेची हानी होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासकीय वसाहतीतील इमारत क्रमांक २० च्या गॅलरीचा भाग दिनांक ३० जून, २०२४ रोजी खाली कोसळला असून, सदर दुर्घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरळीतील मोक्याच्या जागेवर असलेल्या या संपूर्ण वसाहतीचा बी.डी.डी. चाळीच्या धर्तीवर शासनाने पुनर्विकास करून दुग्धशाळेतील कर्मचाऱ्यांना मोफत घरे देणेबाबत व उर्वरित घरांत शासनाच्या अधिकारी वर्गास समाविष्ट करून घेण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने धोकादायक अवस्थेत असलेल्या वरळी दुग्धशाळा वसाहतीचा पुनर्विकास करण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या वरळी येथील शासकीय वसाहतीतील इमारतींचे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वरळी यांचेमार्फत इमारतींचे संरचनात्मक परिक्षण करण्यात आले असून, त्यानुषंगाने इमारतींची देखभाल दुरूस्तीकरीता व धोकादायक पाण्याची टाकी निष्कासित करण्यासाठी दिनांक २६/०७/२०२४ आदेशान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार दुरूस्तीचे काम चालु आहे.

दुग्धशाळेतील कर्मचाऱ्यांना मोफत घरे देण्याबाबत शासनाचे कोणतेही धोरण नसून वरळी वसाहतीतील इमारती कमकुवत झाल्याने, सदर इमारतीतील कर्मचाऱ्यांना पर्यायी सोय म्हणून वरळी येथील उपलब्ध असलेल्या पर्यवेक्षीय तसेच कामगार वसाहतीतील शासकीय निवासस्थाने उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

-----------------

## इतर मागासवर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना थकित भत्ता अदा करण्याबाबत

**(४) * ४२२ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सत्यजीत तांबे, श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इतर मागासवर्ग आणि विमुक्त जाती भटक्या जमाती विद्यार्थ्यांकरीता स्वतंत्र ५२ वसतिगृहे सुरु करण्यात आली आहेत, सदर वसतिगृहांमध्ये अंदाजे ५२०० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, त्यांना मागील चार महिन्यांपासून गृहपाल, लिपिक, शिपाई अशी जवळपास ४०० कर्मचारी सेवा देत आहेत, तसेच या वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या ५ हजार २०० विद्यार्थ्यांना ४ महिन्यांपासून मासिक निर्वाह व भोजन भत्ता आणि शैक्षणिक साहित्यासाठीचा खर्च मिळालेला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर मागासवर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना राबविण्यात आली असून या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना निवास, भोजन व निर्वाह भत्ता म्हणून वर्षाला ६० हजार रुपयांपर्यंत अर्थसहाय्य दिले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेचा भत्ता तसेच स्वतंत्र सुरु केलेल्या ५२ वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांना मासिक निर्वाह व भोजन भत्ता आणि शैक्षणिक साहित्यासाठीचा खर्च न मिळण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी पात्र ठरलेल्या २१६०० इतर मागासवर्ग विद्यार्थी-विद्यार्थीनींना मागील अनेक महिन्यांपासून एकही हप्ता न मिळाल्यामुळे तसेच इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांसाठी राज्यभर सुरु करण्यात आलेल्या ५२ वसतिगृहातील विद्यार्थ्यांना चार महिन्यांपासून भोजन, भत्ता व निर्वाह भत्ता न मिळाल्यामुळे ओबीसी संघटनांनी दिनाक ३ मार्च २०२५ रोजीपासून आंदोलन करण्याचा सामाजिक संघटना व लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ७ फेब्रुवारी २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे इशारा दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी विद्यार्थ्यांनी अनेकदा संबंधित विभागाकडे निवेदन देऊनही शासनाने अद्यापपर्यंत कोणतीच दखल घेतलेली नसून ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेंतर्गतच्या विद्यार्थ्यांना थकीत भत्ता मिळण्याबाबत तसेच वसतिगृहातील विद्यार्थ्यांना मासिक निर्वाह व भोजन भत्ता व शैक्षणिक साहित्याचा खर्च देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२), (३), (४) व (५) इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत कार्यान्वित मुलां/मुलींच्या ५४ वसतिगृहांमध्ये आतापर्यंत एकूण २८४२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. सदर वसतिगृहांमध्ये माहे डिसेंबर, २०२४ अखेर ४३२ कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत.

वसतिगृहातील विद्यार्थ्यांना भोजन भत्ता, निर्वाह भत्ता तसेच मुलींना स्वच्छता साधने इ.करीता रुपये ७,१०,४८,९००/- (रुपये सात कोटी दहा लाख अठ्ठेचाळीस हजार नऊशे फक्त) इतका निधी माहे जानेवारी,२०२५ मध्ये क्षेत्रिय कार्यालयास वितरीत करण्यात आला आहे.

वसतिगृह प्रवेशास पात्र असलेल्या परंतु प्रवेश न मिळू शकलेल्या विद्यार्थ्याकरीता ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना राबविण्यात आली आहे. या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना निवास, भोजन व निर्वाह भत्ता म्हणून परिक्षेत्र निहाय वार्षिक रुपये ३८,०००/- ते रुपये ६०,०००/- इतके अर्थसहाय्य दिले जाते. त्याप्रमाणे पात्र विद्यार्थ्यांना अनुदान अदा करण्याकरीता रुपये १०.०० कोटी इतका निधी क्षेत्रिय कार्यालयास वितरीत करण्यात आला आहे.

ओबीसी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रलंबित मासिक निर्वाह व भोजन भत्ता तातडीने अदा करणेबाबत सन्माननीय लोकप्रतिनीधींचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग केल्याबाबत

**(५)** * **६७१ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून भ्रष्ट मार्गाने ज्ञात उत्पन्नापेक्षा अधिक अपसंपदा संपादीत केली असल्याने परिवहन विभागातील अधिकाऱ्यांविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चौकशी सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा अधिकाऱ्यांना अकार्यकारी पदावर नियुक्ती देण्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शासनाच्या गृह विभागास कळविले असून, सदर सूचना डावलून अशा अधिकाऱ्यांना संरक्षण देण्यासाठी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयात नेमणूक देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामंडळाने काही काळापूर्वी भ्रष्टाचाराच्या तक्रारी असलेल्या अधिकाऱ्यांचे आर्थिक अधिकार काढून त्यांची बदली केली असल्याचे तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चौकशी करित असलेल्या अधिकाऱ्यांना संरक्षण देणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१), (२) व (३) रा.प महामंडळातील दोन अधिकाऱ्या विरुध्द लाचलुचपत विभागाकडून चौकशी सुरु आहे.

संबंधित रा.प अधिकारी हे मध्यवर्ती कार्यालयामध्ये कार्यरत असतानाच लाचलुचपत विभागाने चौकशी सुरु केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने रा.प. महामंडळातील अधिकाऱ्यांविरुध्द सुरु असलेल्या चौकशीचे निष्कर्ष अद्याप कळविलेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: कोल्हापूर जिल्ह्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांना प्रलंबित अनुदान वितरीत करण्याबाबत

**(६) * २८७ श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांना प्रति लिटर पाच ते सात रुपये अनुदान देण्याचा शासनाने निर्णय जाहीर केल्यानंतर आतापर्यंत राज्यात ६ लाख शेतकऱ्यांना त्याचा लाभ देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने दुध उत्पादक शेतकऱ्यांचे माहे सप्टेंबर, २०२४ अखेरपर्यंतचे अनुदान अदा केले असून, उर्वरित महिन्यांचे अनुदान प्रलंबित असल्याचे तसेच कोल्हापूर जिल्ह्यात गाईच्या दूध अनुदानाच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील २० हजार उत्पादकांचे ९ कोटी ६१ लाख ३१ हजार ९३० रुपयांचे अनुदान अद्यापपर्यंत प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील अनुदान हे खाते नंबरात बदल, नावात बदल या कारणांमुळे दिले नसल्याचे शासनाने सांगितले असून त्यावर अनुदानासाठी ज्यांनी प्रस्ताव भरुन घेतले त्या यंत्रणेने संबंधित प्रस्तावांची फेर तपासणी का केली नाही असा प्रश्न दूध उत्पादक शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील २० हजार दूध उत्पादकांचे प्रलंबित असलेले अनुदान त्वरित देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) होय, हे खरे आहे. सदर योजनेतंर्गत देण्यात येणारे अनुदान हे लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येते. यासाठी संबंधित दुध पुरवठादाराने त्याच्या आधार संलग्नीत बँक खात्याचा तपशिल दुध पुरवठा करणाऱ्या संघामार्फत प्रणालीत भरणे आवश्यक आहे. ज्या दुध पुरवठादारांनी बँक तपशिल बरोबर दिला आहे त्यांना अनुदान देण्यात येत आहे. या अनुदान योजनेच्या सॉफ्टवेअरमध्ये तपशील सादर करण्याची जबाबदारी संबंधित दूध संघ /संस्था यांची आहे. सदर संस्थांकडून खाते क्रमांक, टॅग क्रमांक व नावातील बदल याबाबतची सुधारीत माहिती संगणक प्रणालीवर सादर केल्यानंतर सदर माहितीची फेरतपासणी करुन संबंधित दूध उत्पादक शेतकरी यांना डीबीटी द्वारे त्यांच्या बँक खात्यात अनुदान वर्ग करण्यात येईल.

-----------------

## गोरेगाव (मुंबई) येथील आरे वसाहतीतील रुग्णालयाची दुरवस्था झाल्याबाबत

**(७) * ६८ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (मुंबई) येथील आरे वसाहतीतील रुग्णालयात प्राथमिक उपचारांचा अभाव, रुग्णांकरीता खाटांची अपूरी व्यवस्था, डॉक्टर आणि अन्य कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरे वसाहतीत सुमारे २७ आदिवासी पाडे असून सर्पदंश अथवा मानव-वन्यजीव संघर्षातून जखमी झालेल्या रुग्णांना सदर रुग्णालयात सर्वप्रथम दाखल करण्यात येते, सदर परिसरात या रुग्णालयाखेरीज अन्य कोणतीही आरोग्य सेवा उपलब्ध नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गोरेगाव येथील आरे वसाहतीतील रहिवाशांना वैद्यकीय उपचार मिळण्यासाठी तसेच सदरहू रुग्णालयाचे पुनरुज्जीवन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) आरे रुग्णालयात रूग्णांना केवळ बाह्यरुग्ण आरोग्य सेवा अंतर्गत सेवा पुरविल्या जातात गंभीर स्वरूपाच्या रूग्णांना उपचारासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नजीकच्या रूग्णालयात उपचार दिले जातात.
(३) व (४) सदर रूग्णालयाद्वारे स्थानिक रहिवाशांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने रुग्णालयाचे पुनरुज्जीवन करण्याकरीता बृहन्मुंबई महानगर पालिका प्रशासनाशी पुनश्च: चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल.

-----------------

## राज्यात विशेषत: कोल्हापूर जिल्ह्यात राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसच्या वाढत्या अपघातांबाबत

**(८) * ५८५ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रवाशांच्या सेवेसाठी हे ब्रीदवाक्य घेऊन गाव, वाडी वस्तीपर्यंत धावणाऱ्या एसटीचे मागील पाच वर्षांमध्ये १४ हजार ६७४ अपघात झाले असून यामध्ये हजारो प्रवासी मृत्यूमुखी व जखमी झाल्याने एसटी सेवा सर्वसामान्यांसाठी धोकादायक होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापुर जिल्ह्यात गत ५ वर्षांत एसटी बसच्या अपघातांची संख्या चिंताजनक असून सन २०२० ते २०२४ या कालावधीत एसटी बसचे किरकोळ, गंभीर आणि प्राणांतिक असे एकूण ३१७ अपघात झाले असून, या अपघातात ३४ जणांना जीव गमवावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एसटी वाहतुकीला शिस्त लावणे, नव्या बसेस देणे, सर्व डेपोची सुधारणा व दुरुस्ती करणे, महिलांना स्थानकावर पुरेशी शौचालय व संरक्षण सुरक्षा देणे, नवीन बस थांबे तयार करून त्या ठिकाणी बस थांबे उभारणे तसेच एसटी कर्मचाऱ्यांचे मानसिक स्वास्थ्य सुधारुन त्यांच्या सर्व समस्या सोडविणे, लांब

पल्ल्याच्या गाड्यांमध्ये प्रवाशांसाठी लक्झरी टाईप सीट उपलब्ध करुन शून्य टक्के अपघातांची संख्या आणणे इ.सुविधा देण्यासाठी तसेच कोल्हापूर जिल्ह्यासह राज्यातील एसटी बसचे वाढते अपघात रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) सन २०१९-२० ते २०२३-२४ या ५ वर्षामध्ये कालावधीत रा.प.बसचे एकूण १२४५८ इतके अपघात झालेले आहेत.
(२) होय.
(३) व (४) रा. प. महामंडळाने २६४० स्वमालकीची नवीन तयार बसेस महामंडळाच्या वाहन ताफ्यात जमा करण्याचे ठरविले असून, मार्च २०२५ पर्यंत प्राप्त होणाऱ्या ५०० वाहनांपैकी २०४ वाहने प्राप्त झालेली आहेत. या वाहनांना आरामदायी २ X २ प्रकारची आसन व्यवस्था दिलेली आहे.

महिला प्रवासी सहीत सर्व प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने प्रत्येक जिल्हास्तरीय बसस्थानकांवर सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आलेली असून बसस्थानकावर गस्त घालणेबाबत सुरक्षा रक्षकांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच बसस्थानकांवर सी.सी.टी.व्ही. बसविण्यात आलेले आहेत. महिला प्रवाशांच्या बाबतीत अनुचित घटना घडल्यास तात्काळ कार्यवाहीसाठी बसमध्ये SOS बटण देण्यात आलेले आहे.

चालकांना येणाऱ्या अडचणीवर मात करुन त्यांची मनस्थिती उत्तम राहावी यासाठी महामंडळ ठराव क्र.२०१३/०६/१८, दिनांक २५/०६/२०१३ प्रमाणे समुपदेशक पदाची मानधन तत्वावर नेमणुक करण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार समुपदेशन केले जाते.

अपघात टाळण्यासाठी रा.प. महामंडळाच्या आगार / विभाग पातळीवर विविध उपाययोजना नियमितपणे राबविण्यात येतात. सद्य:स्थितीत DB SKILLS AND LIVELIHOOD या संस्थेमार्फत सफर सुरक्षा कार्यक्रमाअंतर्गत तळोजा येथील प्रशिक्षण केंद्रावर अपघात प्रवण चालकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

-----------------

## मुंबईसह ठाणे, नवी मुंबई, सोलापूर व नाशिक जिल्ह्यांमध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांवर कारवाई करण्याबाबत

**(९) * ८६ श्री.सचिन अहिर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजहंस सिंह, ॲड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक २२१४० ला दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) मुंबईसह ठाणे, नवी मुंबई, सोलापूर, नाशिक जिल्ह्यात विशेष मोहिम राबवून तेथे बनावट कागदपत्रांच्या आधारे वास्तव्यास असलेल्या सुमारे ४३ बांगलादेशी नागरिकांना माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, थेऊर (ता.हवेली, जि.पुणे) येथे बांगलादेशी नागरिकांस सातबारा नोंद प्रमाणित करुन त्यांना जमीन मालक केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बांगलादेशी नागरिकांना बनावट कागदपत्रांआधारे संबंधित अधिकाऱ्यांनी आधारकार्ड, पॅनकार्ड बनवून दिल्याचे तसेच राज्यात शेतजमीन खरेदी करतेवळी त्यांची महसूल अभिलेखामध्ये सातबारावर नोंद करताना शेतकरी पुरावा दिल्याशिवाय सातबारा मंजूर होत नसतानाही हवेली तालुक्यातील महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सदर नोंद केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई शहर व उपनगरमध्ये दिनांक १८ जानेवारी ते २८ फेब्रुवारी,२०२५ या दरम्यान किती बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली असून, राज्यातील विविध जिल्ह्यातील बांगलादेशी नागरिकांना त्यांच्या मायदेशी परत पाठविण्यांसदर्भात व त्यांची घुसखोरी रोखण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली तसेच बांगलादेशी नागरिकांना बनावट कागदपत्रे बनविण्यास सहकार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी करून त्यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) माहे जानेवारी, २०२५ मध्ये प्राप्त माहितीच्या आधारे, बनावट कागदपत्रांआधारे भारतीय ओळखपत्र प्राप्त करुन घेतल्याप्रकरणी दहशतवाद विरोधी पथक व राज्यातील विविध स्थानिक पोलीस ठाणे यांच्या संयुक्त कारवाईत राज्यात एकूण ३७ बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेतले आहे. त्यांचेवर स्थानिक पोलीस ठाणे येथे एकूण १८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तसेच राज्यात अवैधरित्या निवास करणाऱ्या बांग्लादेशी नागरिकांवर पुढीलप्रमाणे कारवाई केली आहे –

| अ.क्र. | वर्ष | अटक | हद्दपार |
|---|---|---|---|
| १. | २०२१ | १९२ | १०९ |
| २. | २०२२ | २१७ | ७७ |
| ३. | २०२३ | ५७३ | १२७ |
| ४. | २०२४ | ७१६ | २०२ |
| ५. | दिनांक १५/०२/२०२५ पर्यंत | ५३९ | १२ |

(२) व (३) मौजे थेऊर, ता.हवेली, जि.पुणे येथील गट नं. ९६२ क्षेत्र ० हे. ०५ आर, फेरफार क्र. ५६७०, दिनांक २६/०२/२०२१, खरेदीदस्त क्र.५७२७, दिनांक २९/१०/२०२० ची तपासणी केली असता, हारुलाल पंचानन बिस्वास, रोहीत राजकुमार बिस्वास आणि सुकुमार पंचानन बिस्वास यांनी जमीन खरेदी केली असल्याचे दिसून येते. संबंधिताविरुध्द लोणी काळभोर पोलीस ठाणे, पुणे शहर येथे गु. र. क्र. ६०६/२०२४, भा. न्या.संहिता कलम ३१८, ३३६, ३३८, ३४० सह विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम १४, १४ (अ), १४ (ब), १४(क), पासपोर्ट अधिनियम १९६७ चे कलम १२ पारपत्र (भारतामध्ये प्रवेश) १९५० चे कलम ३ (अ) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तपासादरम्यान हस्तगत कागदपत्रांची सत्यता पडताळण्यात येत असून, सदर गुन्ह्याचा अधिक तपास करण्यात येत आहे. खरेदीदारांपैकी सुकुमार पंचानन बिस्वास यांचे नांवाने शेतकरी पुरावा दाखल आहे. उर्वरीत खरेदीदार यांनी ओळख पटविण्यासाठी फक्त पॅनकार्ड दाखल केले आहे. विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन कार्यवाही केलेली नसल्याने तत्कालीन मंडल अधिकारी, थेऊर यांना कारणेदाखवा नोटीस बजावून खुलासा मागविला आहे.

(४) दहशतवाद विरोधी पथक येथे दाखल गुन्हा दविप गु.र.क्र. ०१/२०२५ मध्ये ०३ बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली आहे. मुंबई शहर व उपनगर मध्ये दिनांक १८ जानेवारी ते २८ फेब्रुवारी,२०२५ या दरम्यान १५४ गुन्हे दाखल असून त्यामध्ये २५१ बांगलादेशी नागरीकांना अटक केली आहे. तसेच १७ बांगलादेशी नागरिकांना त्यांच्या मुळगांवी बांगलादेशात हद्दपार करण्यात आले आहे व ०१ महिला बांगलादेशी नागरीकाचे प्रत्यार्पण करण्यात आले आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे भारतीय ओळखपत्र तयार करुन देणाऱ्या ०७ भारतीय नागरीकांना अटक करण्यात आली आहे.

तसेच वेळोवेळी मोहीम राबवून संशयास्पद बांगलादेशी नागरिकांची माहिती व घर भाडेतत्त्वावर देतांना, कामगार म्हणून नियुक्त करतांना भाडेकरूंची/कामगारांची माहिती पोलीसांना देण्याचे आवाहन करण्यात येते.

तसेच थेऊर (ता.हवेली, जि.पुणे) येथे बांगलादेशी नागरीकांच्या जमीन खरेदी प्रकरणी विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन कार्यवाही केलेली नसल्याने तत्कालीन मंडल अधिकारी, थेऊर यांना कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागविला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१०) * ८६७ श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांकडील पाळीव जनावरांचे संवर्धन, संगोपन होऊन त्यांचे आरोग्य सुदृढ राहावे या उद्देशाने पशुवैद्यकीय दवाखाने सुरु झाले आहेत परंतु कर्मचाऱ्याअभावी हे पशुवैद्यकीय दवाखाने बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली जिल्ह्यात १४१ दवाखाने असून जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागात ४३ पदे रिक्त असल्याने पशुसंवर्धनाची मोहीम केवळ कागदावरच दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांकडील पाळीव जनावरांवर उपचार होऊन त्यांचे संगोपन व संवर्धन व्हावे यासाठी शासनाने पशुसंवर्धन दवाखाने सुरु केले, मात्र दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकारी व परिचर नसल्यामुळे पशुपालकांना खाजगी पशुवैद्यकीय दवाखान्यात जादा दराने जनावरांचे उपचार करावे लागत आहेत, त्यामुळे पशुपालकांना आर्थिक भार सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सांगली जिल्ह्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

पशुपालकांना वेळोवेळी पशुवैद्यकीय व अनुषंगीक सेवा पुरविल्या जात असून, रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या दवाखान्यातील अधिकारी/कर्मचाऱ्यांकडे सोपवून पशुवैद्यकीय सेवा नियमितपणे पुरविल्या जात आहेत. मा.मुख्यमंत्री पशुस्वास्थ योजनेंतर्गत सांगली जिल्ह्यात ४ फिरते

पशुचिकित्सा पथक कार्यरत असून १९६२ टोल फ्री क्रमांकाद्वारे कॉल केल्यानंतर पशुपालकांच्या दारात सेवा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत.
(४) शासन निर्णय दिनांक १०/१०/२०२४ अन्वये पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाची पुनर्रचना व आकृतिबंध मंजूर करण्यात आला असून, या अनुषंगाने रिक्त पदे भरणेबाबत शासनस्तरावरून पदभरतीचे मागणीपत्र सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) विलंब नाही.

-----------------

**बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच यांच्या हत्या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याबाबत**

**(११) * ९३४ श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मस्साजोग (जि.बीड) येथील सरपंच श्री. संतोष देशमुख यांचे अपहरण करुन अत्यंत क्रूरतेने निर्घृण हत्या केल्याची घटना दिनांक ६ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान झाली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच यांच्या हत्येचे पडसाद राज्यभर उमटू लागल्याने या हत्येतील आरोपींना तात्काळ अटक करुन फाशीसारखी कडक शिक्षा देण्यात यावी याकरीता सर्वपक्षीयांकडून प्रचंड जनसमुदायसह मुक मोर्चा, जलसमाधी अशी आंदोलने करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करुन घटनेतील मुख्य सुत्रधार व इतर सात आरोपींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.
(३) या प्रकरणी पोलीस स्टेशन केज गु.र.नं. ६३७/२०२४ कलम १४०(१), १२६(२), ११८(१),३२४(४)(५),१८९(२), १९१(२), १९० भा.न्या.सं. अन्वये फिर्यादी श्री.शिवराज लिंबराज देशमुख यांचे फिर्यादीवरुन दिनांक ०९/१२/२०२४ रोजी १८:४३ वा. गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
सदर गुन्ह्याचा तपास अपर पोलीस अधीक्षक राज्य गुन्हे अन्वेषण विभाग छत्रपती संभाजीनगर हे करीत आहेत. सदर गुन्ह्यातील मुख्य सुत्रधार व इतर आठ आरोपींपैकी मुख्य सुत्रधार व इतर सात आरोपींना अटक करण्यात आलेली असून त्यांचेवर मोका अंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे व एका फरार आरोपीचा शोध सुरु असून गुन्हयाचा तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील वालधूनी आणि उल्हास नदीच्या प्रदुषणात वाढ झाल्याबाबत

**(१२) * ४७६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे : तारांकित प्रश्न क्रमांक २१४४६ ला दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर, डोंबिवली एमआयडीसी (जि.ठाणे) येथील परिसरातून वाहणाऱ्या वालधूनी आणि उल्हास नदीच्या प्रदुषणात दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नदयांमध्ये केमिकल टँकर माफियांकडून मोठ्या प्रमाणात विषारी रसायने सोडली जात असल्याने नदयांचे पाणी दूषित होऊन नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नदयांचे संवर्धन करण्यासाठी तसेच नद्यांचे पाणी प्रदूषित करणाऱ्यांवर कठोर कारवाई करुन नदयांचे प्रदूषण रोखण्याबाबत व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शिवाजीनगर पोलीस स्टेशन, अंबरनाथ यांचेकडून प्राप्त अहवालानुसार प्रश्नाधीन विषयाबाबतची तक्रार त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(३) • उल्हास व वालधुनी नदी क्षेत्रातील औद्योगिक सांडपाणी नदीपात्रात सोडण्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत परवानगी देण्यात येत नाही. अंबरनाथ, बदलापूर व डोंबिवली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील उद्योगांतील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रे (CETP) कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्राबाहेरील उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत शून्य निष्कासन (ZLD) अटींवर संमतीपत्र प्रदान केले जाते.

• कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, व कुळगांव बदलापूर शहरातून निर्माण होणाऱ्या ३४५ दशलक्ष लिटर घरगुती सांडपाण्यापैकी २३३ दशलक्ष लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते व उर्वरीत घरगुती सांडपाणी विना प्रक्रिया उल्हास व वालधुनी नदीमध्ये मिसळत असल्याचे दिसून येते.

• त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस दिनांक २९/११/२०२४ रोजी कारणे दाखवा नोटीस व उल्हासनगर महानगरपालिकेस दिनांक १०/०५/२०२४ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आले आहेत. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत अंबरनाथ नगरपरिषदेस दिनांक १०/०५/२०२४ रोजी प्रस्तावित निर्देश व दिनांक १७/१०/२०२४ रोजी अंतरीम आदेश देण्यात आले आहेत. कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेस दिनांक १७/१०/२०२४ रोजी नगरपालिकेविरूध्द खटला का दाखल करण्यात येऊ नये याबाबतची नोटीस बजावण्यात आली आहे.

• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नदी प्रदूषणाविषयी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने वेळोवेळी पाहणी करण्यात येते व पाहणी दरम्यान संमतीपत्र अटींचे उल्लंघन केल्याचे अथवा जल प्रदूषणास कारणीभूत ठरल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित उद्योगांवर नियमानुसार आवश्यक ती कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात पतंग उडवितांना नॉयलॉन मांजामुळे ७ जणांचा मृत्यू झाल्याबाबत

**(१३) * १०८७ श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मुंबईसह, नाशिक, वसई (जि.पालघर), नंदुरबार व अकोला येथे पतंग उडविताना नॉयलॉन मांजामुळे ७ जणांचा मृत्यू झाल्याचे तसेच छत्रपती संभाजीनगरमध्ये १७ जण गंभीर जखमी झाल्याचे व शेकडो पक्षी मृत झाल्याचे दिनांक १५ जानेवारी,२०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरवर्षी नॉयलॉन मांजामुळे नागरिकांचे जखमी होण्याचे तसेच मृत्यूचे प्रमाण वाढत असूनही व नॉयलॉन मांजावर बंदी घातलेली असताना शासनाने त्याबाबत कायदा वा धोरण तयार केले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात प्रतिबंध असताना नायलॉन मांजाची विक्री करणारे दुकानदार, नायलॉन मांजाच्या सहाय्याने पतंग उडविणारे नागरिक यांच्या विरोधात कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) पतंग उडविताना नॉयलॉन मांजामुळे नाशिक ग्रा., नंदुरबार, अमरावती व नाशिक येथील प्रत्येकी १ असे एकूण ४ जणांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.

पतंग उडविताना नॉयलॉन मांजामुळे नाशिक ग्रा, अकोला, मिरा भाईंदर-वसई विरार, अमरावती येथे प्रत्येकी १ व छत्रपती संभाजीनगर येथे ३ जण असे एकूण ७ जण जखमी झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच शेकडो पक्षी मृत झाल्याचे नोंद निदर्शनास आली नाही.
(२) हे खरे नाही.

मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर येथे दाखल याचिकेनुसार नायलॉन मांजा वापर व विक्रीस पर्यावरण संरक्षण अधि.१९८६ च्या कलम ५ अन्वये प्रतिबंध घालण्याबाबत सुचित केल्याने मा.पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दिनांक १३/१०/२०१६ व ०८/०३/२०२२ रोजीच्या परिपत्रकांन्वये सर्व पोलीस घटक कार्यालयांना सुचित करण्यात आले आहे.
(३) नॉयलॉन मांजा विक्री व मांजा बाळगण्यावर बंदी घातली असताना ज्या व्यापाऱ्यांनी मांजा आपल्या दुकानात बाळगताना मिळून आल्यास पोलीस विभागामार्फत वेळोवेळी तपासून पर्यावरण संरक्षण कायद्यान्वये विक्री करणाऱ्या दुकानदारांवर गुन्हे दाखल करुन प्रभावी कारवाई करण्यात येते. तसेच

नागरिकांकडून नायलॉन मांजामुळे जखमी/ मृत्यू झाल्यास पतंग उडविणारे यांचे विरुध्द नियमाप्रमाणे भारतीय न्याय संहिता कायद्याप्रमाणे कारवाई केली जाते. तसेच घटक कार्यालयांच्या स्तरावर नायलॉन मांजाच्या धोक्याबाबत जनजागृती करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरीतील प्रसाद राणे प्रिंटिंग प्रेसमध्ये बनावट नोटांची छपाई करण्यात येत असल्याबाबत

**(१४) * १४२३ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बनावट नोटा छापण्याचे कारखाने सुरु असल्याचे समजल्यानंतर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी केलेल्या तपासामध्ये रत्नागिरीतील प्रसाद राणे प्रिंटिंग प्रेस येथे बनावट नोटांची छपाई करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गुन्हे शाखेच्या कक्ष १० चे प्रमुख प्रभारी पोलीस निरीक्षक यांच्या नेतृत्वाखालील पथकाने बनावट नोटा तयार करणाऱ्या आरोपींना रंगेहाथ अटक केली असता सदर बनावट नोटा चिपळूण नागरी पतसंस्थेचे शाखा व्यवस्थापक अमित कासार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने आतापर्यंत किती जणांना अटक करण्यात आली तसेच बनावट नोटा छापणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) रत्नागिरीतील प्रसाद राणे प्रिंटींग प्रेस येथे बनावट नोटांची छपाई करण्यात येत असल्याची बाब माहे, जुलै २०२४ दरम्यान निदर्शनास आली, ही बाब खरी आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी गु.प्र.शा.गु.र.क्र.६२/२०२४ (मानखुर्द पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.नं.२९९/२०२४), भारतीय न्यायसंहिता, २०२३ मधील कलम १७८, १७९, १८०, ६१ (२), ३(५) अन्वये दिनांक १९/०७/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात आढळून आलेल्या बाबी विचारात घेता गुन्ह्यांच्या कलमांमध्ये वाढ करण्यात आली असून त्यानुसार भारतीय न्यायसंहिता २०२३ मधील कलम १८१ व २३८ दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरणी ०७ आरोपींना अटक करण्यात आली असून सर्व आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यात शासकीय कर्मचाऱ्यांवरील हल्ले रोखण्याबाबत

**(१५) * १४९४ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यामध्ये गतवर्षी शासकीय कर्मचाऱ्यांवर हल्ला झाल्याच्या १५ घटना घडल्या असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त हल्ल्यांमध्ये कृषी पर्यवेक्षक व तलाठी या पदावरील कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे तसेच सेनगाव तालुक्यातील ब्रम्हवाडी ते लिंबाळा रस्त्यावर अवैध रेती प्रकरणात कारवाई करण्यासाठी गेलेल्या पथकातील तलाठ्यावर टिप्पर घालून जीवे मारण्याचा प्रयत्न झाला असून यासंदर्भात सेनगाव पोलीसात तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व चौकशीच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांवर होणारे हल्ले रोखण्याबाबत तसेच सेनगाव प्रकरणात तलाठ्याला जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) या सर्व प्रकरणांची चौकशी करण्यात आली असून संबंधित आरोपींवर भा.दं.वि. अंतर्गत कलमांनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच काही आरोपींना अटक करण्यात आली असून फरार आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. अशा प्रकारे सरकारी नोकरांवर हल्ल्याच्या दुर्घटना घडू नयेत म्हणून वाळू चोरांवर कारवाया करताना महसूल विभागाने पोलीस बंदोबस्त घेण्याबाबत जिल्हाधिकारी यांना वेळोवेळी पत्र व्यवहार करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणुन या गुन्ह्यांमधील आरोपींना तात्काळ अटक करण्याच्या कारवाया करण्यात आल्या आहेत आणि संबंधित आरोपींविरुध्द परिणामकारक प्रतिबंधक कारवाया करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात पश्चिम महाराष्ट्रात विशेषत: कोल्हापूर व सांगलीमध्ये अंमली पदार्थांच्या तस्करीमध्ये वाढ झाल्याबाबत

**(१६) * ३८१ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.विक्रांत पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोल्हापूर, सांगलीसह पश्चिम महाराष्ट्रात मेफेड्रॉन, कोकेन, चरस, गांजा इत्यादी अंमली पदार्थांची साठवण व तस्करी होत असून मुंबई व नवी मुंबईसह इतर महानगरेदेखील अंमली पदार्थांच्या विळख्यात सापडत असल्याने कल्चरच्या नावाखाली विद्यार्थ्यांसह बेरोजगार तरुण, तरुणी नशेच्या आहारी जात असल्याचे व विदेशी टोळयांद्वारे अंमली पदार्थांचा विक्री व पुरवठा केला जात असून यामध्ये

नायजेरियन आणि बांगलादेशी नागरिकांचे प्रमाण अधिक असून अंमली पदार्थांमुळे नशेच्या आहारी गेलेल्या शेकडो तरुणांच्या आयुष्याचे नुकसान होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा शहराजवळ असलेल्या कार्वे औदयोगिक वसाहतीत मेफॅड्रॉन एमडी ड्रग्ज तयार करणाऱ्या कारखान्यांवर दिनांक २७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास गुन्हे अन्वेषण पथकाने छापा टाकून २९ कोटी ७३ लाख ५६ हजार २०० रुपयांचे अंमली पदार्थ जप्त केले आहेत तसेच वाळवा तालुक्यात झोपेच्या गोळ्यांचे सेवन, ताडी व गांजा अशा नशेच्या पदार्थांची विक्री, छोट्या-मोठ्या व्यवहारात हस्तक्षेप करून खंडणी मागणे असे प्रकार चालू असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंमली पदार्थामुळे तरुणांमध्ये गुन्हेगारीची प्रवृत्ती वाढत असल्यामुळे स्थानिक रहिवाशी व पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने अंमली पदार्थांची साठवण, विक्री, पुरवठा व तस्करी करणाऱ्यांविरूध्द अंमली पदार्थ विरोधी विभाग (नार्कोटिक्स) कडून कारवाई करण्याबाबत तसेच तरुणांना अंमली पदार्थाच्या सेवनापासून रोखण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या इसमांविरुध्द एनडीपीएस कायदा १९८५ अन्वये कारवाई करण्यात येते. कोल्हापूर, सांगलीसह पश्चिम महाराष्ट्रातील विविध जिल्हा /शहरी भागात अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे व गुन्हे प्रकटीकरण शाखा यांचेमार्फत अंमली पदार्थ जवळ बाळगणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात येते. तसेच स्थानिक पोलीस ठाणे स्तरावर अंमली पदार्थांचे सेवन करणारे सेवानार्थी इसमांविरुध्द देखील कारवाई करण्यात येते.

अंमली पदार्थ कायद्यांतर्गत मुंबई शहरामध्ये सन २०२४ मध्ये एकूण ११५३ गुन्हे दाखल करण्यात आले असून १३४२ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. त्यामध्ये परदेशी नागरिकांविरुध्द १२ गुन्हे दाखल केले असून एकूण १३ परदेशी नागरिकांना अटक करण्यात आली आहे.तसेच नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्याक्षेत्रामध्ये सन २०२४ मध्ये अंमली पदार्थ कायद्यांतर्गत आफ्रीकन नागरिकांविरुध्द २१ गुन्हे व बांग्लादेशी नागरिकांविरुध्द १ गुन्हा दाखल केलेला असून त्यामध्ये एकूण ५६ आरोपींना अटक करण्यात आले आहे.

मुंबई तसेच नवी मुंबई यांचे कार्यक्षेत्रात वेळोवेळी परदेशी/बांग्लादेशी नागरिक यांचेबाबत गोपनीय माहिती घेवून राहत असलेल्या ठिकाणी कोम्बींग ऑपरेशन करुन, अंमली पदार्थांची विक्री व पुरवठा व तस्करी करताना आढळून आल्यास त्यांचेविरुध्द एनडीपीएस ॲक्ट मधील कायदेशीर तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात येते.

(२) विटा (ता.खानापूर जि.सांगली) येथील कार्वे औद्योगिक वसाहती मध्ये स्थानिक गुन्हे अन्वेषण, शाखा,सांगली यांनी छापा टाकून कारवाई केली आहे. सदर कारवाईत मेफेड्रॉन (एम. डी. ड्रग्ज) तयार करण्याचा कारखाना व ड्रग्ज मिळून आल्याने विटा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ५२/२५ एन.डी.पी.एस. ॲक्ट

१९८५ चे कलम ८(क), २१ (क), २५, २९ अन्वये दिनांक २८/०१/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात मेफेड्रॉन (एम.डी.ड्रग्ज) व ते बनवण्यासाठी लागणारे केमिकल आणि इतर साहित्य असे सर्व मिळून एकूण रुपये २९,७३,५६,२००/-किंमतीचा चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच वाळवा तालुक्यामध्ये सन २०२४ - २०२५ मध्ये झोपेच्या गोळयांचे सेवन व ताडी अशा नशेच्या पदार्थांची विक्री, छोट्या मोठ्या व्यवहारात हस्तक्षेप करून खंडणीची मागणी केल्याबाबत गुन्हे दाखल नाहीत. परंतु गांजा या सदराखाली इस्लामपूर जि.सांगली पोलीस ठाणे येथे गु.र.न.१०९/२०२४ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ चे कलम ८ (क), २० (ब)(२), २० (ब), २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) व (४) राज्यात सन २०२४ मध्ये अंमली पदार्थ कायदयांतर्गत सेवनार्थींच्या विरुध्द १५८७३ गुन्हे दाखल करण्यात आले असून, १४२३० आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे, वाहतूक करणे यासंदर्भात एकूण २७३८ गुन्हे दाखल झालेले असून, ३६२७ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच सदर कारवायांमध्ये एकूण रुपये ४२४०.९० करोड इतक्या किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहेत.

राज्यात अंमली पदार्थावर नियंत्रण व उच्चाटन :- • राज्यात अंमली पदार्थाच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्याकरीता शासनाने महाराष्ट्र राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये स्वतंत्र "अंमली पदार्थ विरोधी कक्ष" स्थापन केलेला आहे.

• शासनाने राज्याकरीता स्टेट ॲपेक्स लेव्हल कमिटी व दिनांक ३१/०८/२०२३ च्या शासन निर्णयाद्वारे "ॲन्टी नार्कोटिक्स टास्क फोर्स" ची (ANTF) निर्मिती केली आहे.

• पोस्ट ऑफीस व कुरीअर सेवा कंपन्यांच्या पार्सल सेवेच्या माध्यमातून अंमली पदार्थाच्या होणाऱ्या विक्रीस आळा घालण्याकरीता पोस्ट ऑफीस व कुरीअर सेवा कंपन्यांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत मार्गदर्शक सुचनावली तयार करून त्यांना पाठविण्यात आली आहे.

• जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त दरवर्षी २६ जून पासून पंधरा दिवस अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविले जाते. सदर कालावधीत अंमली पदार्थ विरोधी कक्षामार्फत तसेच स्थानिक पोलीस ठाणे मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रात शाळा, महाविद्यालय, रेल्वे स्थानके व महत्वाच्या चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स, बॅनर्स लावले जातात, पत्रके वाटली जातात. तसेच पथनाट्य आयोजित करून जनजागृती केली जाते. इतर वेळी सुध्दा ठिकठिकाणी अशासकीय सामाजिक संस्थाच्या सहकार्याने अंमली पदार्थ विरोधात जनजागृतीचे कार्यक्रम आयोजीत केले जातात.

• अंमली पदार्थ विरोधी काम करणाऱ्या अशासकीय संस्था व राज्य शासनामार्फत चालविण्यात येणारी व्यसनमुक्ती केंद्रे येथील पदाधिकाऱ्यांशी समन्वय ठेवला जातो. व्यसनाधीन लोकांना व त्यांच्या नातेवाईकांना त्याबाबत माहिती दिली जाते.

• स्वयंसेवी संस्था व आरोग्य विभाग यांच्या मार्फत व्यसनी तरूणांचे पुर्नवसन करणे, व्यसनमुक्ती केंद्रातून अशा तरूणांचे समुपदेशन व मार्गदर्शन करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## परळी (जि.बीड) मध्ये राखेच्या टिप्परने दुचाकीला दिलेल्या धडकेत सरपंचांचा मृत्यू झाल्याबाबत

**(१७) * ७०० श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे हत्या प्रकरणानंतर परळी (जि.बीड) येथील सरपंच क्षीरसागर हे घरी जाण्यासाठी दुचाकीने निघाले असता मिरवट-मांडवा पाटीजवळ परळीहून धर्मापुरीकडे जाणाऱ्या राखेच्या टिप्परने दिलेल्या धडकेत त्यांचा मृत्यू झाला असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने दोषी आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन परळी ग्रामीण येथे गु.र.न.१३/२०२५ दिनांक १२/०१/२०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी भोजराज उर्फ भोजु उर्फ भोजाजी मर्गु देवकर रा.वडार कॉलनी यास दिनांक १२/०१/२०२५ रोजी अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस स्टेशन परळी ग्रामीण करत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात महादेव ॲपच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१८) * ६४४ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महादेव ॲपच्या माध्यमातून एकाच व्यक्तीच्या नावावर ९०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप एका विद्यमान लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने महादेव ॲपच्या माध्यमातून गैरव्यवहारात दोषी आढळून आलेल्या संबंधिताविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी सायबर पोलीस स्टेशन, बीड येथे गु.र.क्र. ७३/२०२४ अंतर्गत भारतीय न्याय संहीता कलम ३२३, ११२, ६१, ३(५), माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील कलम ६६ व महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमातील कलम ४, ५ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्ह्यातील एकूण ९ आरोपींपैकी

७ आरोपींना अटक करण्यात आली असून, मा.प्रथमवर्ग न्यायालयात दिनांक १६/०९/२०२४ रोजी दोषारोप पत्र क्र. १२/२०२४ दाखल करण्यात आले आहे.

तसेच, मिरा भाईंदर- वसई विरार पोलीस आयुक्तालयामधील काशिमीरा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ४४३/२०२३ अंतर्गत भारतीय दंड विधान कलम ४२०, १२०(ब) व महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमातील कलम ४, ५ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एकूण ५० आरोपींपैकी १ आरोपीस अटक झाली आहे. नमुद गुन्ह्यात मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, ठाणे यांचे न्यायालयात दिनांक २९/११/२०२३ रोजी दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधेरी (मुंबई) येथील 'सेज ॲकॅडमी'ने विद्यार्थ्यांची फसवणूक केल्याबाबत

**(१९) * १०८ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई) येथील 'सेज ॲकॅडमी' ने कोणत्याही कॉलेजमध्ये व्यवस्थापन कोट्यातून वैद्यकीय अभ्यासक्रमाला प्रवेश मिळवून देतो अशी जाहिरात करून अनेक विद्यार्थ्यांच्या पालकांकडून पैसे घेवून कोटयवधी रुपयांची फसवणूक केल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वैद्यकीय प्रवेश मिळवून देतो म्हणून अनेक विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या 'सेज ॲकॅडमी' च्या आरोपींना अटक करून संबंधितांवर कारवाई करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) आणि (२) अंशतः खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी दिनांक २५/११/२०२४ रोजी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने फिर्यादी व इतर ०८ जणांची एकूण रुपये ४५ लाखांची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाल्याने एकूण ०३ व इतर साथीदार यांचेविरुध्द साकीनाका पोलीस ठाणे, बृहन्मुंबई येथे दिनांक ०६/०१/२०२४ रोजी गु. र. क्र. ००११/२०२५ कलम ३१८ (४), ३१६(२) भारतीय न्यायसंहिता, २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना अटक करण्यात आलेली नाही. गुन्हा तपासाधीन आहे

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाच्या मॅक्सी कॅब धोरणामुळे एसटी बस सेवेला धोका निर्माण होणार असल्याबाबत

**(२०) * ५७८ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने तयार केलेल्या १०० दिवसांच्या आराखड्यात मॅक्सी कॅब सारखी वाहने रस्त्यावर धावणार असल्याने सर्वसामान्य प्रवाशांची वाहतूक करणाऱ्या राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे आर्थिक नुकसान होणार असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात अनेक खाजगी बसेस मनमानी भाडे आकारुन अधिक प्रवासी वाहून नेणे व इतर अटी शर्तीची पूर्तता न करताच वाहतूक करीत असून त्यावर नियंत्रण ठेवणारी शासनाची यंत्रणा उपलब्ध नसल्याने गाव तेथे एसटी संकल्पना मोडीत निघणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रवासी संघटना आणि कर्मचारी संघटनांना विश्वासात न घेता आणलेले मॅक्सी कॅब धोरण शासन रद्द करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मॅक्सी कॅब धोरण रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) मॅक्सी कॅब धोरणास मान्यता देण्याबाबतचा अंतिम निर्णय अद्याप घेण्यात आलेला नाही.
(२) विहित केलेल्या कमाल भाडेदरापेक्षा जास्त भाडे आकारणाऱ्या खाजगी कंत्राटी प्रवासी बसेसची नियमित तपासणी करुन दोषी आढळून येणाऱ्या वाहनांविरुध्द कारवाई करण्याबाबतच्या सूचना राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयांना देण्यात आलेल्या आहेत.
(३) व (४) मॅक्सी कॅब धोरणास मान्यता देण्याबाबतचा अंतिम निर्णय अद्याप घेण्यात आलेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कारागृहांमध्ये क्षमतेपेक्षा जादा कैदी असल्याबाबत

**(२१) * ६६ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर : तारांकित प्रश्न क्रमांक २३३५७ ला दिनांक ४ जुलै, २०२४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कारागृहात क्षमतेपेक्षा जास्त कैदी ठेवण्यात आले असून यामध्ये ७९ टक्के कैदी ‘कच्चे म्हणजेच न्यायाधीन कैदी’ असल्याची गंभीर बाब दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कैद्यांविरोधात विविध न्यायालयात मोठ्या प्रमाणात खटले प्रलंबित असून ठाणे आणि येरवडा कारागृहात सर्वाधिक कच्चे कैदी असून मुंबईच्या कारागृहाचा तिसरा क्रमांक लागतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील तुरुंगव्यवस्थेवर पडणारा ताण पाहता कैद्यांना जामिन देण्याबाबत त्याचप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार एखादया गुन्हयासाठी जेवढी शिक्षा आहे, त्या शिक्षेच्या अर्धा कालावधी जर एखादया चौकशीअधीन कैद्याने तुरुंगात व्यतित केला असेल तर (फक्त काही प्रकरणात) जामिन द्यावा असे निर्णय दिलेले असतानाही कैदी तुरुंगात आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले असू चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील कारागृहांतील न्यायाधीन कैद्यांचा प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी तसेच त्यांच्यावर विविध न्यायालयांत मोठ्या प्रमाणात प्रलंबित असलेले खटले निकाली काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे. राज्यातील कारागृहांची अधिकृत बंदीक्षमता ही २७११० असून दिनांक ३१/१२/२०२४ अखेरपर्यंतची प्रत्यक्ष बंदीसंख्या ३९००९ इतकी आहे. त्यामध्ये ८१% कच्चे कैदी/ न्यायाधीन बंदी असून त्यांची एकूण बंदीसंख्या ३१४८९ इतकी आहे.
(२) हे खरे आहे. दिनांक ३१/१२/२०२४ रोजी येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे एकूण ५४५२, ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे एकूण ३९३३ व मुंबई मध्यवर्ती कारागृह येथे एकूण ३३३६ असे कच्चे कैदी/न्यायाधीन बंदी बंदीस्त आहेत.
(३) अंशतः खरे आहे. राज्यातील कारागृहांमध्ये भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ या नवीन कायद्याच्या कलम ४७९ नुसार न्यायाधीन बंद्यांचे विनंती अर्ज मा.न्यायालयास जामिनासाठी पाठविण्यात येतात. सदर बंद्यांना जामिन देणे अथवा नाकारणे ही बाब मा.न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येते.
(४) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता अधिनियम, २०२३ च्या कलम ४७९ नुसार जामिन मिळण्यासंदर्भात कारागृहांमार्फत पाठपुरावा करण्यात येतात. राज्यातील सर्व कारागृहे व संबंधित न्यायालयात व्हिडीओ कॉन्फरन्सिंग सुविधेद्वारे जास्तीत जास्त बंद्यांची सुनावणी व वैद्यकीय अधिकारी, पोलीस अधिकारी यांची साक्ष नोंदविण्यात येते. तसेच बंद्यांना कोर्टपेशीकरीता नियमितपणे व्हि.सी. व पोलीस पथकाद्वारे संबंधित न्यायालयासमोर हजर करण्यात येते. बंद्यांना त्यांच्या नातेवाईक आणि वकीलांच्या भेटीसाठी मुलाखत देण्यात येते.

गरीब बंद्यांना केंद्र शासनाच्या Support to Poor Prisoners या योजनेंतर्गत अद्यापपर्यंत २९ न्यायाधीन बंद्यांना जामिनाची रक्कम भरण्यास व एका शिक्षा बंद्याला दंडाची रक्कम भरण्यास आर्थिक मदत करण्यात आली आहे. सामाजिक संस्था व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्यामार्फत न्यायाधीन बंद्यांना मोफत कायदेविषयक सल्ला व सहाय्य करण्यात येते. तसेच त्यांच्या न्यायालयीन प्रकरणांचा जलदगतीने निपटारा होण्यासाठी येरवडा, मुंबई व ठाणे मध्यवर्ती कारागृहाच्या आवारामध्ये जेलकोर्ट ची व्यवस्था करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.